REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# माहितीचा अधिकार कायद्याची फलनिष्पत्ती




ज्ञानेश्वर दत्तात्रय भागवत[१] प्रा. डॉ. शरद तुकाराम घोडके[२]
[१]संशोधक विद्यार्थी
[२]पीएच् . डी. मार्गदर्शक

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने २००५ साली केलेला माहितीचा अधिकार कायदा हा अत्यंत चांगला असा कायदा आहे. खऱ्या अर्थाने माहितीचा अधिकार कायदा हा जनताभिमुख असल्यामुळे हा कायदा भारतीय लोकशाहीस सदृढ बनविणारा आहे. कारण, या कायद्यात सत्तेच्या दुरूपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य आहे. प्रशासकीय पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जनतेच्या प्रती उत्तरदायित्त्व अशा विविध कसोटीवर या कायद्याने बरेचसे यश संपादन केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत अनेक कायदे करण्यात आले. तथापि, शासन व जनता यांच्यात जवळीक साधणारा हा कायदा तसा थोडा वेगळा मानावा लागेल. या कायद्यामुळे भारतीय नागरिकांचा मानसिक, सामाजिक, राजकीय दृष्टीकोन बदलण्यास मदत झाली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे प्रशासकीय राज्यकारभारात निर्माण झालेला भ्रष्टाचार, दफ्तरदिरंगाई कमी होण्यास मदत होईल असा आशावाद धरण्यास हरकत नाही. माहितीचा अधिकार कायदा अस्तित्त्वात येण्याआधी प्रशासनावर ब्रिटिशकालीन शासकीय गोपनीयतेच्या कायद्याचा प्रभाव होता. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही शासकीय गोपनीयतेच्या कायद्याचा प्रभाव भारतीय प्रशासनावर पडलेला आढळतो. शासकीय गोपनीयतेच्या कायद्यामुळे प्रशासनात भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई, लालफितीचे धोरण, अकार्यक्षमता या पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथा तशाच राहिल्या. मात्र, काळानुसार प्रशासनात बदल होऊन लोककल्याणकारी राज्य, सुशासन या संकल्पना जसजशा पुढे येऊ लागल्या, तसतसा प्रशासकीय कामकाजात बदल होत गेला. त्यातच २००५ साली माहितीचा अधिकार कायदा लागू झाल्यानंतर प्रशासनात अमूलाग्र बदल होत गेले. या कायद्याद्वारे सामान्य नागरिक प्रशासनावर व प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवू लागले आहेत. या कायद्यामुळे प्रशासनात निर्माण होणाऱ्या गैरकारभाराला व भ्रष्टाचाराला आळा बसण्यास, प्रशासकीय कारभारावर नियंत्रण ठेवण्यास मदत होत आहे. या कायद्यामुळे प्रशासनातील दप्तरदिरमगाई, भ्रष्टाचार, लालफितीचे धोरण यांसारखे दोष कमी होताना दिसत आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे विविध प्रशासकीय योजना, प्रशासकीय ध्येयधोरणे व कार्यक्रम, त्यांना मिळालेली मंजूरी, प्रशासनातील आर्थिक बाबी व इतर घडामोडी इत्यादी संबंधीची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळते. याचाच एक सकारात्मक परिणाम म्हणजे प्रशासनातील गैरप्रकारांना चांगलाच आळा बसला आहे. यातून जबाबदार व पारदर्शक प्रशासन निर्माण होण्यास मदत होत आहे. २००५ मध्ये माहितीचा अधिकार कायदा अस्तित्त्वात आल्यानंतर, सुरूवातीस या कायद्याविषयी लोकांमध्ये जागृती नसल्यामुळे या कायद्याचे महत्त्व लोकांना वाटत नव्हते. पण काळ जसजसा पुढे सरकत आहे; तसतसे लोकांना या कायद्याविषयीचे महत्त्व पटू लागले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार कायद्याचे महत्त्व नागरिकांना, प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना व्यवस्थित समजल्याने या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे. तसेच, माहितीचा अधिकार कायद्यामुळे नागरिकांना प्रशासकीय माहिती देणे हे बंधनकारक आहे. या कायद्यामुळे नागरिकांना प्रशासकीय कामकाजाची माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्याअनुषंगाने माहितीचा अधिकार कायद्याने आजपर्यंत जे साध्य केले आहे, त्याचा फलनिष्पत्तीच्या रूपात या लेखामध्ये पुढीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

## १. माहिती सहज उपलब्धत होणे शक्य

प्रशासकीय व्यवस्थेसाठी लागू करण्यात आलेला हा कायदा प्रत्यक्ष जनतेच्या हातातील आयुध असल्यामुळे जनतेच्या दैनंदिन गरजांशी व समस्यांशी निगडित असलेली माहिती नागरिकांना या कायद्यामुळे सहज उपलब्ध होत आहे. या कायद्यामुळे नागरिकांना प्रशासनाच्या विविध विकास कामाची व योजनांचीही माहिती देखील सहज उपलब्ध होत आहे.

### २. माहितीचा अधिकार कायद्याचा हेतू व उद्देश्य काही प्रमाणात सफल

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने संसदीय लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केला. परंतु, ही लोकशाही फक्त नावापुरती शिल्लक राहिली होती. कारण, सरकारी ध्येयधोरणात व त्यांच्या अंमलबजावणीत काही दोष दिसत होते. शासकीय अधिकारी व पदाधिकारी यांना त्यांच्या कर्तव्यांचा व जबाबदाऱ्यांचा विसर पडला होता. त्यामुळे भ्रष्टाचारदेखील वाढीस लागलेला होता. म्हणून सर्वसामांन्य नागरिकांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी, यासाठी माहितीच्या अधिकार कायद्याची गरज मोठ्या प्रमाणात जाणवू लागली होती. प्रशासकीय कामकाज पारदर्शक करण्यासाठी, भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी, शासनयंत्रणांची जबाबदारी व कार्यक्षमता वाढविण्यासाठी, नागरिकांना शासकीय कामकाजाची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी, नागरिकांच्या अभिव्यक्तीच्यास्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी, राज्यकारभार करताना घेण्यात आलेले निर्णय पारदर्शकपणे व निःपक्षपणाने घेण्यात आले किंवा नाही हे जनतेला समजण्यासाठी, प्रशासनाला कर्तव्यनिष्ठ जबाबदार व जनताभिमुख करण्यासाठी, शासनयंत्रणेमध्ये नागरिकांच्याप्रती उत्तरदायित्त्व निर्माण करण्यासाठी इत्यादी हेतू साध्य करण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा निर्माण करण्यात आला. हे उद्देश्य व हेतू काहीअंशी या कायद्यामुळे सफल झाल्याचे निदर्शनास आले आहे. या कायद्यामुळे शासनाच्या कारभारात पारदर्शकता येत असल्याचे दिसून येत आहे. याशिवाय, भ्रष्टाचारावर अंकुश ठेवणे काही प्रमाणात शक्य झाले आहे.

### ३. प्रशासनात लोकसहभाग वाढीस

लोकशाहीत लोकसहभाग हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. म्हणूनच, माहितीचा अधिकार आणि प्रशासकीय कारभारात लोकसहभाग या दोहोंची सांगड घालणे अत्यावश्यक आहे, अशी भूमिका आता जगभर मान्य झाली आहे. माहितीचा अधिकार कायद्याद्वारे प्रत्येक नागरिकाच्या माहिती मिळवण्याच्या हक्काला मान्यता मिळाली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे जनतेला प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवता येत असल्यामुळे जनतेचा प्रशासकीय कामकाजातील लोकसहभाग दिवसेंदिवस वाढीस लागलेला दिसून येत आहे. प्रशासनातील लोकसहभागामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाणही कमी होताना दिसून येत आहे.

### ४. पारदर्शक आणि खुल्या शासनाची निर्मिती

माहितीचा अधिकार हा मानवाधिकाराचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या कायद्यात नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व, जबाबदारी, कार्यक्षमता, परिणामकारकता इत्यादी साधने माहितीचा अधिकार कायद्याची परिणामकारक साधने आहेत. या साधनांचा सकारात्मक असा परिणाम प्रशासनावर पडलेला दिसतो. माहितीचा अधिकार कायद्यामुळे शासकीय ध्येयधोरणांची सर्व माहिती जनतेला मिळणार असेल तरच पारदर्शक व खुल्या शासनाची संकल्पना उद्भवते. पारदर्शक व खुले शासन म्हणजे शासनाच्या कामकाजाची सर्व माहिती जनतेला उपलब्ध करून देणे होय. अर्थात, पारदर्शक व खुले शासन म्हणजे स्वच्छ शासन होय. अशा पारदर्शक व खुल्या शासनामुळे शासनाची कार्यक्षमता वाढायला मदत होते. अलिकडच्या काळात पारदर्शक आणि खुल्या शासनाची निर्मिती करणे माहितीचा अधिकार कायद्यामुळे शक्य झाल्याचे दिसून येत आहे.

### ५. प्रशासकीय कार्यक्षमता आणि उत्तरदायित्वात वाढ

प्रशासकीय कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व हा माहितीचा अधिकार कायद्याचा महत्त्वाचा वैचारिक आधार म्हणता येईल. कारण, माहितीचा अधिकार कायद्याअंतर्गत लोक माहिती मागत असल्यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता आणि प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जनतेच्याप्रती असलेले उत्तरदायित्व देखील वाढत चालले आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी आता जबाबदारीने काम पार पाडताना दिसून येत आहे.

### ६. भ्रष्टाचाराला विरोध करणे शक्य

भारताच्या सर्वांगीण क्षेत्राच्या विकासातील सर्वांत मोठा अडथळा म्हणजे भ्रष्टाचार होय. भारतात संरक्षण क्षेत्रापासून ते प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचार हे भारताच्या विकासासाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी घातक आहे. सर्वसामान्य माणसाचे कोणतेच काम लाच दिल्याशिवाय किंवा भ्रष्टाचाराशिवाय होत नाही. आपल्या देशात अनेक योजना राबविल्या जातात. मात्र, भ्रष्टाचारामुळे त्या योग्य पध्दतीने राबविल्या जात नाहीत, त्यामुळे त्या अयशस्वी होतात. म्हणूनच माहितीचा अधिकार

कायद्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्यास व नियंत्रण ठेवण्यास मदत झाली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलनाची जबाबदारी सरकारला आणि प्रशासनाला आता घ्यावी लागत आहे.

### ७. सामान्य नागरिकांचे सबलीकरण

माहितीचा अधिकार कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला हवी असणारी माहिती मिळत आहे. माहितीचा अधिकार कायद्याशिवाय नागरिकांचे सबलीकरण होणे शक्य नव्हते. या कायद्यामुळे सर्वसामान्य जनतेला शासनव्यवस्था आणि प्रशासकीय कारभार यांविषयी माहिती मागता येत असल्यामुळे सामांन्य नागरिकांचे सबलीकरण झाले आहे.

### ८. लोकांचा सहभाग वृध्दिंगत करून शासन आणि जनता यांच्या जवळीकता

शासनाला लोककल्याणकारी दृष्टीकोनातून लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करावे लागते. जर लोकांना शासनाच्या ध्येयधोरणांमध्ये व नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले तर नियोजनप्रक्रिया अधिक प्रभावशाली होते. यासाठी नागरिकांना विविध प्रकारांची माहिती असणे आवश्यक असते. लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी शासन आणि जनता यांच्यात जवळीकता निर्माण होण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा महत्त्वाचा ठरला आहे.

### ९. नागरिकांचा प्रशासनावरील वाढता विश्वास आणि शासकीय धोरणांना प्रतिसाद

माहितीचा अधिकार कायद्याअंतर्गत अर्जदाराला हवी असलेली माहिती प्रशासनाकडून मागता येत असल्यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढण्यास या कायद्यामुळे मदत झाली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे शासकीय ध्येयधोरणांना जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### १०. माहितीचा अधिकार कायद्याचा लोकप्रशासनावरील वाढता प्रभाव

माहितीचा अधिकार कायद्यामुळे प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये कार्यक्षमता आणि उत्तरदायित्वाची भावना निर्माण झाल्याचे दिसून येते. आधुनिक काळात जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, माहिती आणि तंत्रज्ञान यांसारख्या घटकांमुळे लोकप्रशासनाच्या भूमिकेत आणि कार्यप्रणालीत आमूलाग्र स्वरूपात बदल घडून आला आहे. माहितीचा अधिकार कायद्याचाही लोकप्रशासनावर प्रभाव पडला आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे लोकप्रशासनाची भूमिका ही दिवसेंदिवस कार्यक्षम, प्रभावशाली, प्रतिसाधात्मक आणि उत्तरदायित्वाची बनली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे लोकप्रशासनात असणाऱ्या उणिवा दूर करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, लोकप्रशासन हे अधिकाधिक अचूक, प्रभावी व परिवर्तनशील बनत असल्याचे दिसून येत आहे. माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी प्रशासनामध्ये खुलेपणा व पारदर्शकता यांचा अभाव होता. तसेच प्रशासकीय कामे नैतिकतेला व मूल्यांना बाजूला ठेवून केली जात होती. परंतु माहितीचा अधिकार कायद्यामुळे प्रशासनात बदल झाला असून त्यात खुलेपणा आणि पारदर्शकता निर्माण झाली आहे. या कायद्यामुळे प्रशासकीय मूल्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन झाल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार कायद्यामुळे लोकप्रशासनाची भूमिका अधिकाधिक सकारात्मक बनली आहे. लोकप्रशासन आता अधिक बहिर्मुखी व लोकाभिमुख बनले आहे. तसेच लोकप्रशासन हे बंदिस्त अवस्थेत न राहता खुलेपणाच्या माध्यमातून सकारात्मक भूमिका पार पाडत आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे स्थानिक शासन संस्थांमध्ये संदेशवहनाबाबत सकारात्मक स्वरूपाची व सहकार्याची भावना वाढीस लागली आहे. माहितीचा अधिकार कायद्यामुळे लोकप्रशासन अधिक पारदर्शक व जनतेच्याप्रती उत्तरदायित्वपूर्ण बनले आहे.

थोडक्यात, प्रशासकीय प्रक्रियेत माहितीचा अधिकार कायद्याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. या कायद्याद्वारे नागरिकांना आपल्या समस्या सोडविण्यासाठी, गरजांची पूर्तता करण्यासंदर्भात प्रशासनाकडे जाब विचारण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे प्रशासकीय कारभारात पारदर्शकता, कामकाजाच्या बाबतीत गतिशीलता व कार्यक्षमता निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, या कायद्याच्या अंमलबजावणीत काही प्रमाणात अडथळे येत आहेत. त्याअनुषंगाने, या कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी माहितीचा अधिकार कायद्याचा गैरवापर न होता सकारात्मक पद्धतीने वापर होणे अपेक्षित आहे.

### संदर्भ :-

१. कायदा माहितीचा अन् अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा प्रल्हाद कचरे आणि शेखर गायकवाड, यशदा, पुणे.



LBP PUBLICATION

२. मदन राजाराम काळे, “स्थानिक स्वशासनातील माहिती अधिकाराची अंमलबजावणी : औरंगाबाद महानगरपालिका व जिल्हा परिषद यांचा तुलनात्मक अभ्यास” पीएच. डी. प्रबंध, २०१५
३. श्री. कुऱ्हे, माहिती अधिकाराचा सुशासनावरील परिणामाचा अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्ह्यातील महसूल विभाग
४. “जिल्हा प्रशासन आणि माहिती अधिकाराचा एक चिकित्सक अभ्यास – विशेष संदर्भ लातूर जिल्हा”13-conclusion.pdf

LBP PUBLICATION